# ११.सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), संबंधित जिल्हा परिषद. |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आविशी-२००९/प्र.क्र. २०/ का. १२ दि. ३१ मे २०१०<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ - २०१७/प्र.क्र. १३४/ का. १२ दि. १७ एप्रिल २०१८ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | राज्यातील अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते १० वी मध्ये आश्रमशाळा व्यतिरिक्त इतर मान्यताप्राप्त शाळेत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागविणे व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांची गळती थांबविणेसाठी सदर योजनेचा खालील प्रमाणे लाभ देण्यात येतो.<br><br>अ.क्र. / इयत्ता / शिष्यवृत्तीचा वार्षिक दर प्रति विद्यार्थी/ प्रति विद्यार्थीनी<br>१ / इ. १ ली ते इ. ४ थी / रु. १०००/-<br>२ / इ. ५ वी ते इ. ७ वी / रु. १५००/-<br>३ / इ. ८ वी ते इ. १० वी / रु. २०००/-<br><br>• सदर रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यात वर्ग करण्यात येते.<br>१. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी व त्याचे आई वडील यांनी विहीत नमुन्यात अर्ज करून तो शाळेच्या मुख्यध्यापकांकडे सादर करावा. आई/वडील हयात नसल्यास विद्यार्थ्यांच्या पालकांनी अर्ज सादर करावेत.<br>२. १० वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांचे आई/वडील/कायदेशीर पालक यांच्या नावाने खात्याची माहिती व १० वर्षावरील विद्यार्थ्यांचे स्वतःचे बॅंक खात्याची माहिती. |
| ०४ | पात्रता/निकष | १. अनुदानित/विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये इ. १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत लाभ घेता येईल.<br>२. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रतिमाह ८०% असणे आवश्यक आहे.<br>३. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>४. नामांकित शाळांमध्ये, सैनिकी शाळांमध्ये, इंग्रजी माध्यमाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ज्यामध्ये शासनाकडून त्यांच्या शिक्षणाचा खर्च अदा करण्यात येतो अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>५. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निमशासकीय (केंद्र व राज्य शासन) व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (केंद्र व राज्य शासन) तसेच शासन अनुदानित संस्थामध्ये सेवा करत आहेत, तसेच ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू.१.०८ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती अंतर्गत लाभ देय राहणार नाही.<br>६. नापास झालेल्या विद्यार्थ्यांना त्याच इयत्तेमध्ये दुसऱ्यांदा सदर योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही. परंतु सदर नापास विद्यार्थी पास होऊन त्यांनी वरच्या इयत्तेत प्रवेश मिळविल्यास त्यांना त्या इयत्तेमध्ये या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ देय राहणार राहील. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | सदर अर्ज संबंधित प्राथमिक / माध्यमिक शाळेत उपलब्ध आहेत. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | १. प्रत्यक्ष प्रवेशावेळी पालकाचा / विद्यार्थ्यांचा अनुसूचित जमातीचा दाखला<br>२. पालकांचा उत्पनाचा दाखला.<br>३. विद्यार्थ्यांचे / पालकांचे बँक खात्याची माहिती.<br>४. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड<br>५. पालकांच्या उत्पनाचा दाखला (तहसीलदार यांनी निर्गमित केलेला.) |